वाचा :- 1) मा.जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रं.जिनिक/क.लि./नै.आ.व्या./कावि /2021
दिनांक 7-4-2021 व 8-4-2021

क्रं.2021/आपत्ती व्यवस्थापन/कावि-
जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड
दिनांक 09 एप्रिल-2021

**आ दे श**

विषय :- Remdesivir Injection चा पुरवठा व वितरण संदर्भाने समन्वयासाठी समिती स्थापन करणे बाबत.

उपरोक्त मा.जिल्हाधिकारी,नांदेड यांचे संदर्भीय आदेश दिनांक 7-4-2021 व 8-4-2021 अन्वये या जिल्ह्यात वाढत्या कोविड संक्रमित रुग्णाच्या संख्येमुळे रेमडेसिव्हर औषधाच्या वाढत्या मागणीकरिता त्याचे पुरवठा व वितरण यावर नियंत्रण ठेवणेकामी आदेशीत करण्यात आलेले आहे. तसेच सदर औषधाचा काळाबाजार रोखणेकामी प्रत्येक मान्यता प्राप्त खाजगी कोविड रुग्णालयांना रेमडेसिव्हर औषधाचा वापर ज्या रुग्णाकरिता झालेला आहे,त्या रेमडेसिव्हर औषधाचे लेबल बाटलीवरुन काढून संबधित रुग्णाच्या केसपेपरवर लावून जतन करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे.

उक्त आदेशाच्या अनुषंगाने सदरील औषधावर नियंत्रण ठेवणेकामी अपर जिल्हाधिकारी,नांदेड यांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती स्थापन करण्यात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | के.आर.परदेशी,अपर जिल्हाधिकारी,नांदेड | - | अध्यक्ष |
| 2) | सिध्देश्वर धुमाळ उपविभागीय पोलीस अधिकारी,नांदेड | - | सदस्य |
| 3) | सुजित नरहिरे,तहसिलदार अर्धापूर | - | सदस्य |
| 4) | डॉ.शिरसीकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक,नांदेड | - | सदस्य |
| 5) | आर.एस.राठोड,सहा.आयुक्त,अन्न व औषध प्रशासन | - | सदस्य सचिव |

उक्त समितीने रेमडेसिव्हर औषधाचा समन्याची वाटप व वापराबाबत कार्यवाही करावी.

1) रेमडेसिव्हर औषधाची मागणी व पुरवठा आणि वापर याबाबत दैनंदिन निरिक्षण करणे
2) रेमडेसिव्हर औषध प्रत्येक मान्यता प्राप्त खाजगी कोविड रुग्णालयातील रुग्णाला अत्यावश्यक गरजेप्रमाणे वितरण याबाबत नियंत्रण करणे.
3) रेमडेसिव्हर औषधाचा साठा औषध कंपन्याचे गोडाऊनमार्फत जिल्ह्यातील वितरक व मान्यता प्राप्त खाजगी कोविड रुग्णालयाशी सलग्ण असलेले औषधी दुकान यांना उपलब्धतेवर नियंत्रण ठेवणे
4) रेमडेसिव्हर औषधाचा कृत्रिम तुटवडा व काळाबाजारी करणा-यावर कडक कार्यवाही करणे

सदर बाबीसाठी गरजेनुसार जनतेंना मार्गदर्शन व तक्रारीचे अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नांदेड येथे मदत कक्ष सुरु करण्यात आले आहे,त्याचा हेल्पलाईन दुरध्वनी क्रमांक 02462-235077 आहे.

(विपीन इटनकर)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नांदेड